- मानव संसाधन पुरेशा प्रमाणात उपलब्ध नसून अप्रशिक्षीत असल्याचे दिसते. विद्यमान स्थिती विचारात घेवून ग्रंथालयाचा विकास झालेला दिसत नाही.
- आर्थिक बाबतीत उपलब्धता कमी असल्याचे दिसत असून फक्त समाजकल्याण विभागातूनच अनुदान उपलब्ध होत आहे.
- बहुतांश ग्रंथालयात आधुनिक माहिती सेवांचा अभाव आहे.

संशोधन पद्धती

संशोधन हे फक्त कौशल्यांचा संच नाही, तर तो विचार करण्याचा मार्ग आहे. या विचारांच्या चौकटीत सामान्यत: यात संशोधनकर्त्याने काय निरीक्षण केले, पुढील अन्वेषणासाठी प्रयत्न करणे, निरीक्षणे समजून घेणे आणि स्पष्ट करणे आणि निष्कर्ष व अनुमाने, सरावाची गुणवत्ता वाढविणे, कौशल्य व ज्ञानाचा पाया उंचावण्यासाठी, आपल्या कामाकडे चौकसपणे, चिकित्सकपणे आणि विश्लेषणात्मक रीतीने तर्कबुध्दी, यथार्थता, परिणामकारकता आणि कार्यक्षमता याचे सखोल ज्ञान मिळविणे. संशोधन तार्किक आणि बुध्दिप्रामाण्याच्या विचाराचा मार्ग विकसित करते आणि तुम्हाला दैनंदिन परिस्थितीतील प्रत्येक पैलूंचे चिकित्सकपणे परीक्षण करण्यासाठी प्रोत्साहन देते.१०

जिज्ञासा अथवा ज्ञान संपादन करणे ही माणसाची एक मूलभूत प्रवृत्ती आहे. त्यासाठी तो आपल्या ज्ञानेंद्रियांचा उपयोग करीत असतो. भोवतालच्या जीवनाचे अवलोकन करतो व त्यापासून विविध प्रकारचे अनुभव घेतो व मिळविलेल्या ज्ञानाचा

आपल्या जीवनात उपयोग करतो, म्हणजेच कोणतेही नमुन्यादाखल दिलेल्या वरील व्याख्यांवरून हे लक्षात येते की, शास्त्र अथवा विज्ञान म्हणजे ज्ञानसंग्रहाची व तथ्य संपादन करण्याची पध्दत. त्यात ज्ञान आणि ज्ञान मिळविण्याची पध्दत ह्या दोन्ही घटकांवर भर आहे. थोडक्यात, संशोधन ही बौद्धीक प्रक्रीया आहे व संशोधन कार्यात निर्माण होणाऱ्या समस्या व त्यांना सोडविण्यासाठी लागणारे तंत्र व उपाय यांचे नियोजन करणे आवश्यक आहे. यासाठी माहिती संकलन करणे व विश्लेषण करून नमुना निवडीचा आधार ठरविणे आवश्यक असते. त्यानुसार संशोधन पद्धतीमध्ये सर्वेक्षण पद्धतीचा वापर करणे आवश्यक असल्याचे आढळते.

सामाजिक संशोधन

सामाजिक संशोधन हा शब्द दोन शब्दांचा मिळून बनलेला आहे. सामाजिक आणि संशोधन. रेडमेल आणि मोरी ह्या शास्त्रज्ञांच्या मते, संशोधन म्हणजे नवीन ज्ञान प्राप्त करून घेण्यासाठी केलेले पध्दतशीर प्रयत्न. कॉफोर्ड ह्यांच्या मताप्रमाणे संशोधन म्हणजे कोणत्यातरी समस्येच्या सोडवणुकीसाठी क्रमबध्द व विशुध्द चिंतन तथा विशिष्ट उपकरणाद्वारे केलेला प्रयोगविधी. कोणतेही संशोधन जेव्हा सामाजिक तथ्ये, घटना, सिध्दान्त अथवा नवीन ज्ञान ह्या बाबतीत संबंधित असते, तेव्हा त्याला सामाजिक संशोधन म्हणतात. सामाजिक संशोधन ही एक प्रक्रीया अथवा पध्दत आहे.

१) पी.व्ही.यंग – ह्यांच्या मते, "सामाजिक संशोधन म्हणजे सामाजिक जीवनाबाबत नवीन तथ्ये शोधण्यासाठी अथवा जुन्या तथ्यांचे परीक्षण करण्यासाठी त्या तथ्यातील अनुक्रम, परस्परसंबंध व कार्यकारणभाव यांविषयी स्पष्टीकरण आणि सामान्यीकरण प्रस्थापित करण्याची एक पध्दतशीर प्रक्रिया होय."

२) मोझर– ह्यांच्या मताप्रमाणे, "सामाजिक घटना व समस्या ह्यांबाबत नवीन ज्ञान प्राप्त व्हावे म्हणून केलेल्या क्रमबध्द संशोधनाला सामाजिक संशोधन असे म्हणतात."

या व्याख्यांवरून हे लक्षात येते की, सामाजिक संशोधनात नवीन तथ्ये उजेडात आणणे, जुन्या तथ्यांचे प्रामाण्य सिध्द करणे, तथ्यांचा अनुक्रम, परस्परसंबंध, त्यांच्यातील कार्यकारणभाव ठरवणे, त्यावरून शास्त्रशुध्द पध्दतीने नियम शोधून काढणे, त्या नियमांचे स्पष्टीकरण करणे इत्यादी कार्यांचा समावेश होतो.

संशोधन प्रक्रिया :

संशोधन कार्यासाठी निर्दोष माहिती मिळण्यासाठी व संशोधनाची उद्देशपुर्ती होण्यासाठी प्रमाणीकृत संशोधन पद्धतीचा वापर केला गेला. संशोधनाची उद्दिष्टे अभ्यासुन त्यानुसार संशोधन करण्याकरिता सर्वेक्षण व विश्लेषण पद्धतीचा उपयोग करण्यात आला. प्रस्तुत संशोधनामध्ये सर्वेक्षण ैनतअमल डमजीवकद्ध पद्धतीचा प्रयोग करण्यात आला. प्रस्तुत अभ्यास विषय ''महाराष्ट्रातील अनुदानित समाजकार्य महाविद्यालय ग्रंथालयाचा विकास : एक चिकित्सक अभ्यास'' हा असल्यामुळे सर्वेक्षण पद्धतीद्वारे संशोधन करण्यात आले. प्रकरणाच्या या विभागात अध्ययनाकरीता उपयोगात आणल्या गेलेल्या कार्यपद्धतीचे वर्णन करण्यात आले आहे.

संशोधनाचे कार्यक्षेत्र :

प्रस्तुत संशोधन करण्यासाठी संशोधन क्षेत्र म्हणुन अध्ययनकर्त्याने संपुर्ण महाराष्ट्र राज्याची निवड केली.

अध्ययन विश्व :

प्रत्येक संशोधनात संशोधकाचे पहिले कर्तव्य हे असते की, आपल्या संशोधनाविषयी माहिती घेणे, जसे लोकसंख्येचा आकार, उपलोकसंख्या कशाप्रकारे आहे यावर आधारलेले असावे. प्रस्तुत अध्ययन हे वस्तुनिष्ठ असावे या संदर्भात काळजी घेतली आहे. प्रस्तूत अध्ययनात महाराष्ट्रातील सर्व अनुदानित समाजकार्य महाविद्यालयातील ग्रंथपालांचा अध्ययन विश्व म्हणून विचार करण्यात आला.

संशोधन आराखडा :–

प्रत्येक संशोधनाचा एक निश्चित लक्ष्य आणि उद्देश असतो. या लक्ष्य व उद्देशाच्या पूर्ततेसाठी संशोधनात विषय वस्तूंच्या अनेक रूपाची पडताळणी केली जाते. अशा पडताळणीसाठी प्रयुक्त योजना हाच संशोधनाचा आराखडा होय. म्हणजेच संशोधन २८ आराखडा एक तार्किक व व्यवस्थित योजना आहे.१२ प्रस्तुत संशोधनात निर्माण झालेल्या निष्कर्षाची

संशोधन उद्देशाच्या दृष्टीने संबद्धता व संशोधन कार्यात मितव्ययता याची सांगड घालण्यात आली आहे. अर्थातच तथ्यांचे योग्य संकलन व विश्लेषण यासाठी आवश्यक अटीची पूर्तता करून वर्णनात्मक संशोधन आराखडयाची निवड करण्यात आली आहे

नमुना निवड :

विश्व हे व्यापक रूपात पसरलेले असल्यामुळे त्यातून नमुना निवडणे आवश्यक आहे. तथ्य किंवा सामुग्रीचे विश्व हे व्यापक व विशाल असते त्यामुळे संशोधकाला तथ्य संकलन करण्यात मर्यादा पडतात. त्यामुळे नमुना निवड करणे अतिशय गुंतागुंतीचे परंतु तितकेच महत्वाचे कार्य आहे. संशोधनकर्ता अध्ययन विश्वातील ज्या काही एककांची निवड करतो ते निवडलेले एकक किंवा हा नमुना संपूर्ण अध्ययन समग्राचे व विश्वाचे प्रतिनिधीत्व करणारा असावयास हवा. नमुना निवडीच्या विभिन्न पद्धतीच्या गुणदोषाचा पूर्ण विचार करूनच नमुना निवडला गेला आणि अध्ययनास आवश्यक म्हणून एकापेक्षा जास्त नमुना निवडीच्या पद्धतीचा उपयोग करण्यात आला आहे. निवड करतांना वेळ शक्ती व पैसा याचा अपव्यय न होता, निवडण्यात आलेला नमुना संपूर्ण अध्ययन विश्वाचे प्रतिनिधीत्व करणारा आहे याची खबरदारी संशोधनकर्त्याने घेतलेली आहे. सामाजिक तथ्य गोळा करण्यासाठी त्या संशोधन समग्रातील प्रत्येक सदस्यांची किंवा एकमेकांशी संपर्क स्थापन करणे व त्यांच्याकडून तथ्य संपादन करणे शक्य होत नाही म्हणून समुहाचे प्रतिनिधी सदस्य निवडून त्यांच्याकडून तथ्य संकलन करण्यात आले व ही माहिती संपूर्ण समुहाची किंवा समग्राची आहे असे मानण्यात आले. प्रस्तुत शोधकार्यातील विश्लेषणाकरीता महाराष्ट्रातील सर्व (५५) अनुदानित समाजकार्य महाविद्यालयातील ग्रंथपालांचा लोकसंख्या म्हणुन विचार करण्यात आला व परंतु, प्रत्यक्षात ४६ महाविद्यालयातील ग्रंथपालांकडून माहिती प्राप्त झाली.

महाराष्ट्रातील विभागनिहाय जिल्ह्यानुसार महाविद्यालय व ग्रंथालये

महाराष्ट्रामध्ये भौगोलिक दृष्ट्या सहा विभाग पाडलेले असून त्यात अमरावती विभागात ९ समाजकार्य महाविद्यालये, औरंगाबाद विभागात ८ समाजकार्य महाविद्यालय, कोकण विभागात १ समाजकार्य महाविद्यालय, नागपूर विभागात २२ समाजकार्य महाविद्यालय, नाशिक विभागात ८ समाजकार्य महाविद्यालय, पुणे विभागात ७ समाजकार्य महाविद्यालय व त्यांची ग्रंथालये कार्यरत आहेत.

अ.क्र.	विभाग	जिल्हा	ठिकाण	महा. ग्रंथालयांची संख्या
१.	अमरावती	१. अकोला २. अमरावती ३. बुलढाणा ४. यवतमाळ ५. वाशिम	खडकी अमरावती मलकापूर पुसद, विठ्ठलवाडी वाशिम	२ १ २ ३ १
२	औरंगाबाद	६. औरंगाबाद ७. उस्मानाबाद ८. परभणी ९. जालना १०. नांदेड ११. बिड १२. लातूर १३. हिंगोली	औरंगाबाद उस्मानाबाद सावरगांवा जालना नांदेड आंबेजोगाई लातूर हिंगोली	२ २ २ १ १
३	कोकण	१४. मुंबई १५. ठाणे १६. रायगड १७. रत्नागीरी १८. सिंधुदूर्ग	मुंबई	१

४	नागपूर	१९. नागपूर २० भंडारा २१ गोंदिया २२ चंद्रपूर २३ गडचिरोली	नगपूर कामठी उमरेड नरखेड काटोल भंडारा गोंदिया चिमुर वडसा	१ १ १ १ १ १ २ २
५	नाशिक	२४. नाशिक २५. अहमदनगर २६. नंदुरबार २७. धुळे २८. जळगांव २९. अमळनेर	नाशिक अहमदनगर तलोडा कुरूम्बा चोपडा अमळनेर	१ १ २ १ २ १
६	पुणे	३१. पुणे ३२. सांगली ३३. सातारा ३४. सोलापूर ३५. कोल्हापूर	पुणे सांगली सातारा सोलापूर कोल्हापूर	२ १ २ २
जिल्हा निहाय समाजकार्य महाविद्यालयाची यादी				५५

तथ्य संकलन

संशोधनाचा आधार तथ्य सामुग्री मानून संशोधक आपले संशोधन कार्य करतो. त्याच्या अभावी संशोधक संशोधन करू शकत नाही. संशोधनाची यशस्विता तथ्य सामुग्रीच्या साधनाच्या विश्वसनियेतवर निर्भर आहे. म्हणून संशोधकाला आपले अध्ययन सुरू करण्यापूर्वीच तथ्य सामुग्रीच्या संकलनाच्या विविध साधनांची संपूर्ण माहिती असावी लागते

संशोधनाची साधने :

प्रस्तुत अध्ययनात माहिती संकलित करण्याकरिता करण्यात आला. अध्ययनाच्या उद्दिष्टांना अनुसरून प्रश्नावली तयार करण्यात आली. समाजकार्य महाविद्यालयातील ग्रंथपालांकरीता प्रश्नावली तयार करण्यात आली.

दुय्यम स्त्रोत :

तथ्य संकलनासाठी विषयाशी संबंधीत साहित्य, विविध दैनिके, साप्ताहिके, मासिके, वार्षिकांक, पुस्तके, ग्रंथ, नियतकालिके व इतर प्रकाशित साहित्यांचे अध्ययन करण्यात आले. शासनाच्या विविध विभागांमार्फत प्रकाशित साहित्य, शोध प्रबंधाचे अवलोकन आणि परीक्षण करण्यात आले. विविध महाविद्यालयातील तसेच विद्यापीठाच्या ग्रंथालयातून प्राप्त पुस्तके, शोध प्रबंध आणि इतर उपलब्ध साहित्याचा अभ्यास, अवलोकन आणि परीक्षण करुन तथ्ये संकलित केली गेली.

तथ्य प्रक्रीयन

संशोधनात तथ्याचे संकलन अत्यंत महत्वपूर्ण कार्य आहे. परंतु ते संशोधनाचे अंतिम लक्ष्य नाही. तथ्य संकलन तर शोधाच्या लक्ष्य प्राप्त करण्याचे एक साधन आहे. संशोधनाचे लक्ष्य विभीन्न घटनांच्या उत्पत्तीच्या स्त्रोताचा पत्ता लावणे तथा त्यात कार्यकारण संबंधाच्या आधारावर वैध निष्कर्ष प्रतिपादन करणे होय. या उद्देशाच्या प्राप्तीसाठी संकलित तथ्याचे विश्लेषण करण्याची आवश्यकता असते.”

तथ्यांचे संपादन :

तथ्यांचे परिक्षण करून त्यातील उणीवा वा त्रृटी दूर करणे म्हणजे तथ्याचे संपादन होय. तथ्यांचा व्यवस्थित क्रम लावला, उत्तराचे परिक्षण केले आणि अनावश्यक तथ्यांना वगळण्यात आले. संशोधनकर्त्यांने स्वत: प्रश्नावली भरवून घेतल्यामुळे संपादनाचे कार्य जड झाले नाही. अध्ययनाच्या दृष्टीने उपयुक्त नसणाऱ्या तथ्याना वगळण्यात आले. विषयाशी संबंधित असणाऱ्या उत्तराचाच विचार करण्यात आला.

तथ्यांचे संकेतीकरण

संकेतन एक सांख्यिकीय क्रीया आहे. संकेतनाचा अर्थ मोठमोठया वर्णनात्मक उत्तरांना संकेत तथा प्रतिष्ठांच्या माध्यमाने व्यक्त करणे, म्हणूनच मोजर आणि केल्टन म्हणतात.१८ प्रस्तुत अध्ययनात तथ्ये वा प्रतिक्रीया यांना सोयीप्रमाणे अंक व चिन्ह दिले. संकेतीकरणामध्ये उपलब्ध तथ्यांपैकी निरूपयोगी तथ्ये वगळल्या गेली व एक संकेत पुस्तीका तयार केल्या गेली.

सारणीयन:

सारणीयन म्हणजे गुणात्मक तथ्याचा व्यवस्थीत रूपात प्रस्तुत करणे ज्यामुळे त्या सहजरित्या समजून घेऊ शकतात. हॅसिन पाव यंगच्या शब्दात Tabulation is the summarization of results in the form of statistical tables."19 सारणीद्वारे संशोधकाला विविध तथ्यांची सुलभतेने तुलना करता आली. तसेच सारणीवरून तथ्यांचा अर्थ आणि त्याचे महत्व लक्षात येते. तथ्यांचे वर्गीकरण, संकेतन, मोजणी कार्य करणे संशोधनकर्त्यीला सुलभ गेले.

तथ्यांचे सांख्यिकीय विश्लेषण व निर्वचन

सारणीबध्द झालेल्या तथ्यांतील अंगभूत असणारे सत्य आणि अर्थ शोधून काढण्याच्या दृष्टीने अभ्यास करण्याला 'तथ्यांचे विश्लेषण' असे म्हणतात. या प्रक्रियेत गुंतागुंतीच्या घटकांचे सूलभ भागांमध्ये रूपांतर केल्या गेले. सर्व भागांची नविन पध्दतीने रचना केली गेली. तथ्याच्या आधारे महत्वपूर्ण सारण्या निश्चित केल्या गेल्या. समस्येच्या विधानाचे काळजीपूर्वक परीक्षण केले. संशोधकाचे निष्कर्ष व्यापक अर्थाने शोधून काढणे म्हणजेच निर्वचन होय. विश्लेषणाशिवाय निर्वचन करता येत नाही आणि निर्वचनाशिवाय विश्लेषण करता येत नाही हे दोन्ही परस्परावलंबी आहे. प्रस्तुत अध्ययनात संशोधनाच्या संपुर्ण वर्णनात्मक आराखडयाचा अभ्यास करून विविध घटकांची स्थिती याचा अभ्यास केला गेला.

माहितीचे सांख्यिकीय विश्लेषण :

सांख्यकीय तंत्रातील विविध ग्राह्यता चाचणीचा विशेषत्वाने उपयोग करण्यात आला. त्या आधारावर निष्कर्ष काढले गेलेत. प्राप्त माहितीवरुन वारंवारीता (Frequency) व बहुलक (Mode) काढण्यात आले. अभ्यासातील विविध घटक, पडताळण्याकरिता देण्यात आलेले गृहित प्रमेय आणि वापरण्यात आलेला संशोधनाचा आराखडा लक्षात घेता 'Chi-Square' टेस्टचा वापर करण्यात आला. Significance Level 0.05 ठरविण्याात आली. वरील सर्व प्रक्रियानंतर निष्कर्ष जास्तीत जास्त वस्तुनिष्ठ कसे राहतील यांची दखल घेण्यात आली व सांख्यिकीय परीक्षणावरून प्राप्त परीणामांना योग्य त्या आलेख व तक्त्यांचा वापर करून प्रस्तुत करण्यात आले.

संदर्भ

१. कोण्णूर, एम.बी. डायमंड ग्रंथालय व माहीतीशास्त्र कोश, पुणे : डायमंड पब्लीकेशन्स, २००८.
२. टांकसाळे, प्रा., व्यावसायिक समाजकार्य, के'सागर पब्लिकेशन्स, पाचवी आवृत्ती २०१५.
३ जरारे वि., संशोधन प्रणाली, सुविधा पब्लिशर्स, ३५–ए, नटराज नगर, इमली फाटक, जयपूर.
४ बोधनकर सु., अलोनी वि., सामाजिक संशोधन पद्धती, श्री साईनाथ प्रकाशन नागपूर.
५ कुमार, र., संशोधन पध्दती– नवोदितांकरिता क्रमवार मार्गदर्शन, सेज भाषा पब्लिकेशन, दुसरी आवृत्ती २०१७.
६ जरारे वि., संशोधन प्रणाली, सुविधा पब्लिशर्स, ३५–ए, नटराज नगर, इमली फाटक, जयपूर.

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with* International Impact Factor 4.374
UGC Approved Journal Sr. No.48455
ISSN No. 2394-8426
Apr– 2018
Issue–I, Volume–VII (I)

औरंगाबाद जिल्हातील शालेय पोषण आहार योजणेनाला पालकांचा प्रतिसाद एक चिकित्सक अभ्यास

प्रा. सानप सुजाता विक्रम
ग्रहविज्ञान
राष्ट्रमाता इंदिरागांधी महाविदयालय जालना

प्रस्तावना:-

आर्थिक विकासात शिक्षणाचे अत्यंत महत्वाचे स्थान आहे. विविध प्रकारचे विकास कार्यक्रम राबविण्यासाठी आवश्यक असणारे प्रशिक्षित मनुष्यबळ वाढवून मानवी भांडवल निर्माण करण्याचे शिक्षण हे मुख्य साधन आहे.

देशाच्या सामाजिक व आर्थिक विकासातील शिक्षणाची महत्वाची भुमिका लक्षात घेउन शिक्षण विषयक विविध कार्यक्रम राबविले जातात.

प्राथमिक शिक्षण हा शिक्षणाचा पहिला टप्पा असून देशात सुजान नागरीक बनविण्याचा तो पाया आहे.

शिक्षणाचा पाया कच्चा राहील्यास माध्यमिक,उच्च माध्यमिक आणि उच्च शिक्षण घेण्या पर्यत मुले टिकूण राहू शकत नाहीत.पर्यायाने विदयार्थी प्राथमिक शाळेत टिकून राहावेत म्हणून शासनाच्या विविध योजना कार्यरत आहेत.

त्या पैकी शालेय पोषण आहार योजना हि विदयार्थ्यांसाठी यशस्वी आणि उपयुक्त ठरलेली आहे.

प्राथमिक शिक्षण हे प्रत्येकाला मिळाले पाहिजे म्हणजेच प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण केले पाहीजे भारतामध्ये वाढत्या वयाच्या मुलांमध्ये कुपोषणाची समस्या आढळते याचा प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकी करणावर परीणाम होत असल्यामुळे भारत सरकारने शालेय पोषण आहार योजना सुरु केली आहे.

संशोधनाचे महत्व :-

शालेय पोषण आहार योजने अंतर्गत विदयार्थ्यांना सकस व पोष्टीक आहार देण्यात येत आहे. यासाठी रु २ .००/- प्रतिदिन प्रति विदयार्थी खर्च करण्यात आला आहे.

ही योजना अधिक सक्षम व पारदर्शक होण्यासाठी या समाजाचा सहभाग वाढविण्यात येते आहे. याचा एक भाग म्हणून स्थानीक मातांचा सहभाग या योजनेत करण्यात यावा. असे शासन परिपत्रक क्र शालेय पोषण आहार सन २००६ च्या शासन निर्णयान्वये सुचीत करण्यात आले आहे. विदयार्थ्यांना अन्न शिजवून वाटप करण्याच्या प्रक्रिये मध्ये स्थानिक माताचा सहभाग घेतल्यास व त्यांच्या देखरेखी खाली या योजनेची अंमलबजावणी केल्यास दुपारचे भोजन देण्यास नियमितता तर येईलच परंतू भोजनाचा दर्जा वाढविण्यामध्ये त्याचा उपयोग होईल.

दुपारचे अन्न शिजवतांना व त्याचे विदयार्थ्यांना वाटप करता वेळी किमान एका वा अधिक मातांची उपस्थिती राहील याची दक्षता घ्यावी या करीता आवश्यता वाटल्यास मातांना आठवडयातील दिवसाचे वाटप करण्यात यावे.व त्यांनी त्यादिवशी शाळेमध्ये उपस्थित राहण्याकरीता त्यांना प्रोत्साहन दयावे.

संशोधन समस्या विधानातील परिभाषिक संज्ञानचा कार्यात्मक व्याख्या :-

१. प्राथमिक शाळा :-

इयत्ता नुसार :-

इयत्ता पहिली पासून ते इयत्ता आठवी पर्यंतचे शिक्षण म्हणजे प्राथमिक शिक्षण होय. हे शिक्षण देणारे शाळांना प्राथमिक शाळा असे म्हटले आहे.

२. वयानुसार :-

वय वर्ष सहा पासून ते मुल चौदावर्षाचे होईपर्यंत देले जाणारे शिक्षण म्हणजे प्राथमिक शिक्षण होय. व हे शिक्षण ज्या शाळेत दिले जाते त्या शाळांना प्राथिमीक शाळा असे म्हटले जाते.

३. चिकीत्सक अभ्यास :-

चिकीत्सक अभ्यास म्हणजे सुक्ष्म संगोपांग तपशिलवार व समिक्षात्मक अभ्यास होय चिकीत्सक अभ्यासात कारणमिमासा आणि उपाय योजना याचा हि अंतर्भास अपेक्षीत आहे.

४. संशोनाची ग्रहीतके :-

महाराष्ट्र शासनामार्फत सर्व शाळांमध्ये शालेय पोषण आहार योजना राबवली जात आहे. शालेय पोषण आहार योजनेबददल पालकांची सकारात्मक भुमिका.

५. संशोधन समस्येची उददीष्ठये:-

१. शालेय पोषण आहारामुळे मुलांमधिल शारिरीक बदल अभ्यासणे
२. शालेय पोषण आहार योजने मध्ये शैक्षणिक बदल अभ्यासणे
३. शालेय पोषण आहार योजने मध्ये पालकांचा सहभाग असणे
४. शालेय पोषण आहार योजने मधील आहाराचा दर्जा अभ्यासणे

न्यायदर्श निवड :-

संशोधनातुन विविध समस्या साठी मिळालेल्या माहितीच्या आधारे निर्ष्कष काढले जातात. अशा निर्षषाचा सर्व अभ्यासत क्षेत्रासाठी उपयोग करता येतो.

त्यासाठी संशोधकास आपल्या माहितीच्या आधारे समान्यीकरण करण करावे लागते.

न्यायदर्श :-

जनसख्येच्या तथ्याविषयी पुर्वीनमान करण्याकरीता जनसंख्येतून निवडलेली व्यक्ती किंवा वस्तू यांच्या लहाण ससंचला न्यादर्श म्हणतात.

किंवा आपणास असे म्हणता येईल कि समग्र किंवा संपुर्ण अभ्यास क्षेत्रामधुन निवडलेला लहाण भाग म्हणजेच नमुना होय.जेव्हा संपुर्ण अभ्यास क्षेत्राबाबत काही माहिती प्राप्त करून घेण्याचा किंवा काही निष्कर्ष करण्याच्या इरादयाने काही एकक पाहणी करीता निडण्यात येतात.जेव्हा निवडलेल्या एककाच्या उपसमुहास नमुना किंवा न्यायदर्श असे म्हणतात.

*साहित्य आणि कार्यपध्दती *

अध्यायन क्षेत्र:-

औरंगाबाद जिल्हातील प्राथमिक शाळेतील शालेय पोषण आहार योजनेला पालकांचा प्रतीसाद एक चिकीत्सक अभ्यास हे संशोधन हे औरंगाबद जिल्हयापुरते मर्यादीत आहे. या साठी १०० पालकांची निवड करण्यात आली.

<u>नमुना निवड पध्दती:-</u>

कोणत्याही विषयाचा अभ्यास करावयाचा असल्यास नमुना निवड करणे अत्यंत महत्वाचे असते. नमुना निवड पध्दतीत पुढील बाबीचा समावेश करण्यात आला.

औरंगाबाद जिल्हातील प्राथमिक शाळेमधील विदयार्थ्यांच्या १०० पालकांची अध्ययनासाठी निवड करण्यात आली.

ही माहीती जमा करण्यासाठी या ऐच्छीक नमुना निवड पध्दतीचा वापर करण्यात आला.

ही माहिती प्रत्यक्षात पालकांनाकडून भरून घेतली आहे.

पालकांकडून प्राप्त माहितीचे विश्लेषण व अर्थ निर्वचन:-

संशोधन कर्त्यास असे अभिप्रेत आहे की प्राथमिक शाळेतील विदयार्थ्यांना शालेय पोष्ण आहार योजने बददल पालकांचा सहभाग असने गरजेचे आहे. हे जाणुन घेणे आवश्यक वाटते. त्या करीता संशोधन कर्त्याने आपल्या प्रश्नावलीतील सामान्य माहिती विभागातील प्रश्न १ ते ५ खालील प्रमाणे अंतर्भाव केला. उपरोक्त प्रश्नांच्या पालकांचा प्रतीसाद खालील तक्त्यात नमुद केलेला आहे.

<u>तक्ता क्र.१</u>

पालक शाळेला भेट देतात ते दर्शविणारा तक्ता

अ.क्र.	पालक शाळेला भेट देतात	टक्केवारी
१	होय	६५
२	नाही	३५
	एकुण	१००

निष्कर्ष :-

वरील टक्केवारी वरून असे आढळून येते की शालेय पोष्ण आहाराबददल पालक जागरूक आहेत.

<u>तक्ता क्र.२</u>

आहाराची चव दर्शवीनारा तक्ता.

अ.क्र.	आहाराची चव	टक्केवारी
१	निक्रष्ट	१५
२	बरी	२०
३	चांगली	६५
	एकुण	१००

निष्कर्ष :-

१) १५ % पालकांच्या मते निक्रष्ट आहार दिला जातो.

२) तसेच आहाराची चव बरी आहे असे २० % पालक म्हणतात.

३) ६५ % पालकांच्या मते आहाराची चव चांगली आहे.

तक्ता क्र. ३

शालेय पोषण आहारामुळे मुलांमध्ये कोणता बदल झाला.

अ.क्र.	कोणता बदल जाणवला	टक्केवारी
१	दररोज शाळेत जातो	४५
२	नियमीत अभ्यास करणे	३५
३	विविध खेळामध्ये सहभाग	२०
४	एकुण	१००

निष्कर्ष:- १. पालकांच्या मते ४५%मुले दररोज शाळेत जातात.

२. ३५%पालकांच्या मते विदयार्थी नियमीत अभ्यास करतात.

३. २०%पालकांच्या मते विदयार्थी विविध खेळामध्ये सहभागी होतात.

तक्ता क्र. ४

तुम्ही शालेय पोषण आहाराबददल समाधानी आहात का.

अ.क्र.	आहाराबददल समाधान	टक्केवारी
१	होय	६५
२	नाही	३५
	एकूण	१००

निष्कर्ष:-

१. ६५%पालक आहाराबददल समाधानी आहेत.

२. ३५%पालक आहाराबददल समाधानी नाहीत.

तक्ता क्र.५

अन्न पदार्थामध्ये कोणता बदल असावा असे वाटते.

अ.क्र.	अन्न पदार्थात बदल	टक्केवारी
१	पोळी भाजी	५
२	तांदुळ वाटप	५०
३	खिचडी	१०
४	कडधान्यांची उसळ	१५
५	इतर	२०
	एकूण	१००

निष्कर्ष:-

पोळी भाजी असावी असे ५%पालकांना वाटते.

पुर्वीची जी तांदूळ वाटप योजना चालू असावी असे ५०%पालकांना वाटते.

खिचडी असावी असे १०%पालकांना वाटते.

१५%पालकांच्या मते कडधान्याची उसळ असावी असे वाटते.

इतर (उदा.पराठे,धपाटे,पॅकींगचे पदार्थ,)काही वेगळे असावे असे २०%पालकांना वाटते.

ब-यापैकी पालकांना वाटते ही योजना चांगली आहे. परंतु शिक्षक मुख्याध्यापकांचा या मध्ये जास्त वेळ चालला आहे. त्यासाठी शासनाने या खिचडी ऐवजी कोरडा तांदुळ तसेच पॅकिंग पदार्थाची वाटप करावी त्यामुळे मुख्याध्यापक ,शिक्षक याचा वेळ जाणार नाही तसेच काही शाळेमध्ये खिचडी संदर्भात ज्या घटना घडतात त्या घटना घडून त्या शाळेचे नाव बदणाम होणार नाही त्यासाठी महाराष्ट्र शासनाने खिचडी ऐवजी इतर पॅकिंग पदार्थ ठेवावेत.

<u>संदर्भ सुची :-</u>

आरोग्यदिप (२००८) , तरुणातील अपु-या पोषणाच्या समस्या व उपचार आरोग्यदिप वर्ष ३३ व अंक ९ सप्टेंबर २००८

काचौळ दो. धो. (जुलै २०११),समाज शास्त्रीय परंपरा आणि संशोधन पध्दती कैलास पब्लीकेशन औरंगाबाद.

देशपांडे सूचिता(२०११), शिक्षण महत्वाचं पण, चतुरंग लोकसत्ता शनिवार ६ ऑगस्ट २०११.

महाराष्ट्र शासन निर्णय व परीपत्रके, शालेय पोषण आहार योजना.

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with* International Impact Factor 4.374
UGC Approved Journal Sr. No.48455
ISSN No. 2394-8426
Apr– 2018
Issue–I, Volume–VII (I)

शेळी पालन

संशोधक विद्यार्थी
कल्याण गंगाराम सरोदे

प्रस्तावना :

जगात सर्वाधिक शेळ्या चीन मध्ये असून, भारताचा दुसरा क्रमांक लागतो. महाराष्ट्र राज्यामध्ये शेळी पालन हा व्यवसाय शेतीला पुरक व्यवसाय म्हणून समोर येत आहे. कारण राज्यामध्ये सन १९७८ च्या पशुगणनेनुसार शेळ्यांची संख्या ७५.६३ लाख होती ती २००७ च्या पशुगणनेनुसार १०३.९१ लाख झाली म्हणजेच १९७८ च्या तुलनेत २००७ मध्ये शेळ्यांच्या संख्येत २८.२८ लाख एवढी वाढ झाल्याचे दिसून येते. राज्यामध्ये सन-२०१३-१४ मध्ये शेळ्यांपासून २५० मि.टन एवढे दूध उत्पादन झाले तर ५७ मि.टन एवढे मांस उत्पादन झाले होते. १९९७ च्या पशुगणनेनुसार राज्यामध्ये ११४.३४ लाख एवढी होती ती २००३ मध्ये १०४.४९ एवढी झाली तर २००७ मध्ये १०३.९१ एवढी होती. म्हणजेच २००७ पर्यंतच्या पशुगणनेपर्यंत शेळ्यांच्या संख्येत वाढ होत असल्याचे दिसून येत परंतु २०१२ च्या पशुगणनेनुसार ८४.३५ एवढी झाली म्हणजेच २००७ च्या तुलनेत घट झाली असली तरी नवनवीन तंत्राचा व आधुनिक पध्दतीचा वापर करून शेळी पालन करणाऱ्यांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ होत असल्याचे दिसून येते आहे. तसेच राज्यात शेळी व मेंढी पालन करणाऱ्या २२२५ सहकारी संख्या असून, पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळाच्या औरंगाबाद, नांदेड व बीड या तीन ठिकाणी शाखा आहेत.

शेळी पालन व्यवसायाचा इतिहास :

शेळी हा मूळचा रानटी प्राणी असून, रानटी शेळ्यांना ''कॅपरा हिरकस'' हे शास्त्रीय नाव आहे. लॅटीन भाषेत या शब्दाचा अर्थ उत्तम जनावर असा होतो. शेळयांचा मूळ जन्म हा अफगाणिस्तान, बलुचीस्तान, पाकिस्तान, सिंध प्रांताचा डोंगराळ व पठारी भाग, भारतामधील काश्मिरचा डोंगराळ भाग, तिबेटचा भाग, इराण, टर्की आणि ग्रीस इत्यादी भागात ह्या रानटी शेळ्या आढळून येत असे. म्हणजेच या विविध ठिकाणी राहत असलेल्या रानटी शेळ्या ह्या आजच्या शेळीचे पूर्वज असून, शेळी पालन हा व्यवसाय पुरातन काळापासून चालत आलेला आहे. पूर्वी मानव शेळी व मेंढी पालन हा व्यवसाय दुधाची व मांसाची गरज पूर्ण व्हावी म्हणून करीत असत, परंतु सर्वच लोक सदर व्यवसाय करीत नसत तर धनगर समाजच शेळी व मेंढी पालन करीत होता.[२]

शेळी पालन हा व्यवसाय सर्व जाती धर्माचे लोक ग्रामीण भागाबरोबरच शहरी भागात सुध्दा करीत असून, वाढते शहरीकरण, शेतमालाला नसलेला हमी भाव, वाढती लोकसंख्या व त्यांची वाढती मांसाची मागणी या सर्व बाबी पाहता आज विविध समाजातील लोक शेळी पालन या व्यवसायाकडे वळत आल्याचे दिसून येते. तर आज मेंढीपालन हा व्यवसाय धनगर समाज मोठ्या प्रमाणात करीत आहे.

शेळी पालनाचे महत्त्व :

शेळी पालन हा व्यवसाय कमी खर्चात जास्त उत्पादन देणारा व्यवसाय असून, वाढती लोकसंख्या, बेरोजगारीच्या प्रमाणात होत असलेली वाढ, भारतात तसेच विदेशात ही शेळ्यांच्या मासाची वाढती मागणी, शेळ्यांच्या सर्व अवयोवापासून निरनिराळे उपयोग, शेळ्यांच्या दुधात असलेल्या औषधी गुणधर्मामुळे दुधाच्या मागणीत होत असलेली वाढ, आणि दिवसेंदिवस शेती ही तोट्यात जात असल्यामुळे शेतीला जोड व्यवसाय म्हणून शेळी पालन हा व्यवसाय अतिशय फायदेशीर असा व्यवसाय अल्यामुळे शेळी पालन या व्यवसायाचे दिवसेंदिवस महत्त्व वाढत असून, जास्तीत जास्त लोक या व्यवसायाकडे वळत असल्याचे दिसून येते.

महाराष्ट्र राज्यातील बागायती शेतीचे प्रमाण १७ टक्के असून, कोरडवाहू शेतीचे प्रमाण हे ८३ टक्के आहे. म्हणजेच महाराष्ट्र राज्यामध्ये सिंचनाचा अभाव असून, ८३ टक्के शेती क्षेत्र हे पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे.[३] अवेळी पडणारा पाऊस, दुष्काळ, वाढती बेरोजगारी, कर्जबाजारीपणा, शेती क्षेत्रात वाढती उदासिनता यामुळे नवीन सुशिक्षित वर्ग आज मोठ्या प्रमाणात आधुनिक पध्दतीने करता येणाऱ्या शेळी व मेंढी पालन व्यवसायाकडे /उद्योगाकडे आकर्षित होत आहे. इतर व्यवसायापेक्षा या व्यवसायात कमी भांडवल गुंतवून सदर व्यवसाय सुरू करता येतो. तसेच शेतीच्या कामातून फावल्या वेळात सुध्दा शेळ्यांचे पालन पोषण करता येते. त्यांची रोगप्रतिकारक शक्ती उत्तम असून, मृत्यूचे प्रमाण कमी असते. तसेच खाद्यावर कोणताही खर्च न करता, मुक्त पध्दतीने संगोपन करता येऊन कौटुंबिक अडचणीच्या वेळी विक्री करून पैसे मिळविता योतात व कुटुंबाच्या उत्पन्नात भर टाकता

येते. यामुळे शेळीपालन व्यवसायाचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत असून, शेतीला पुरक व्यवसाय म्हणून शेळी पालन व्यवसायाची भरभराट होत आहे.

ग्रामीण स्वयंरोजगारासाठी शेळीपालन :

पशुसंवर्धन विभागामार्फत दर ५ वर्षाला पशुगनणा घेण्यात येते. महाराष्ट्र राज्य अस्थित्वात येण्याअगोदर सर्व प्रथम मुंबई राज्यामध्ये पशुसंवर्धन विभागामार्फत १९२० मध्ये पहिली पशुगनणा घेण्यात आली. तर १९६१ मध्ये महाराष्ट्र राज्याच्या स्थापने नंतर सर्व प्रथम ९ वी पशुगनणा अर्थ व सांख्येकीय संचालनालया मार्फत घेण्यात आली होती. आमापर्यंत राज्यामध्ये १९ पशुगनणा झालेल्या असून, १६ व्या पशुगनणेनुसार राज्यातील शेळ्यांची संख्या ११४.३४ लाख एवढी आहेत. तर १७ व्या पशुगणनेनुसार १०४.४९ लाख, १८ व्या पशुणनेनुसार १०३.९१ लाख एवढी असून, १९ व्या म्हणजेच १२ व्या पशुगणनेनुसार ८४.३५ लाख एवढी शेळ्यांची संख्या आहे. म्हणजेच या चार पशुगणनेनुसार शेळ्यांच्या संख्येत दिवसेदिंवस घट होत असल्याचे दिसून येते परंतु आधूनिक पध्दतीने शेळी पालन करणाऱ्यांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे.

शेळी पालनाचे फायदे :

शेळीपालन या व्यवसायाचे अनेक फायदे असून, त्यापैकी काही महत्त्वाचे फायदे खालील प्रमाणे :-

१. शेळीपालन हा व्यवसाय कमी खर्चात जास्त उत्पादन देणारा व्यवसाय आहे.
२. शेळ्यांचे दूध लहान मुलांना पिण्यासाठी पैष्टीक असते.
३. शेळ्या निकृष्ट दर्जाचे अण्ण खाऊन चाऱ्याची गरज भागवतात.
४. शेळी पालन या व्यवसायासाठी इतर व्यवसायाच्या तुलनेत कमी जागा लागते.
५. शेळ्यांचे दोन पिढीतील अंतर कमी असून लवकर उत्पादन मिळते.
६. काही जातींच्या शेळ्यांपासून लाकर (मोहर) मिळते.
७. शेळ्यांच्या शिंगापासून व खुरापासून डिंकयुक्त पदार्थ बनविलेजातात.
८. शेती साठी रासायणिक खतापेक्षा शेळ्यांचे खत उत्कृष्ट असते.
९. शेळी पालन व्यवसाय महिलांमार्फत सहज केला जाऊ शकतो.
१०. देशात गोमांस जास्त लोक खात नसल्यामुळे व शेळीचे मासं सर्व धर्माचे लोक खात असल्यामुळे शेळीच्या मासांला जास्त प्रमाणात मागणी आहे.

अशाप्रकारे शेळी पालनाचे विविध फायदे असल्याचे दिसून आहेत. म्हणून शेळी पालन या व्यवसायात मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे.

भारतीय अर्थव्यवस्थेत शेळ्यांचे महत्त्व :

शेळी पालन हा व्यवसासय पुर्वी पारंपारीक पध्दतीने केल्या जात असे तर आजही हा व्यवसाय पारंपारीक पध्दतीने ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात केल्या जात आहे. परंतु अलिकडील काळात या व्यवसायाकडे शासनाने लक्ष घातल्याचे दिसून येते ते म्हणजे महाराष्ट्र राज्यामध्ये स्वतंत्र पुण्यश्लोक अल्यिादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळाची स्थापना केली. सदर महामंडळाच्या महाराष्ट्रात एकूण ११ शाखा आहेत या शाखेमधुन सदर महामंडळ संपूर्ण महाराष्ट्रभर कार्य करीत आहे. म्हणजेच, भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये इतर प्राण्यांना ज्याप्रमाणे महत्त्व आहे त्याप्रमाणेच शेळी या प्राण्यास महत्त्व प्राझाल्याचे दिसून येते. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात आजही पारंपारीक पध्दतीने शेळी पालन केल्या जाते. परंतु महामंडळाच्या स्थापनेपासून आधूनिक पध्दतीने शेळीपालन करण्यास सुरूवात झाल्याचे दिसते. तसेच भारतात व महाराष्ट्रात आधूनिक पध्दतीने शेळी पालन करणाऱ्या विविध संस्था कार्यरत आहे त्या संस्थाद्वारे आधूनिक पध्दतीने शेळी पालन कसे करावे याविषयावर लाखो शेतकरी प्रशिक्षण घेऊन आधूनिक पध्दतीने व्यापारी तत्त्वावर शेळी पालनाकडे वळत आहेत.

भारतात सन-२००२-०३ मध्ये ८६.२ मि.टन, २००३-०४ मध्ये ८८.१ मि.टन, २००४-०५ मध्ये ९२.५ मि.टन, २००५-०६ मध्ये ९७.१ मि.टन, २००६-०७ मध्ये १०२.६ मि.टन, २००७-०८ मध्ये १०७.९ मि.टन, २००८-०९ मध्ये ११२.२ मि.टन, २००९-१० मध्ये ११६.४ मि.टन, २०१०-११ मध्ये १२१.८ मि.टन आणि २०११-१२ मध्ये १२७.९ मि.टन एवढे दूध उत्पादन झाले होते. म्हणजेच वरील आकडेवारी पाहता असे दिसून येते की, भारतातील एकूण दूध उत्पादनात सतत वाढ होत असल्याचे दिसून येते.

भारतामध्ये एकूण मांस उत्पादपन सन-२००२-०३ मध्ये २.१ मि.टन, २००३-०४ मध्ये २.१ मि.टन, २००४-०५ मध्ये २.२ मि.टन, २००५-०६ मध्ये २.३ मि.टन, २००६-०७ मध्ये २.३ मि.टन, २००७-०८ मध्ये ४.० मि.टन, २००८-०९ मध्ये ४.३ मि.टन, २००९-१० मध्ये ४.६ मि.टन, २०१०-११ मध्ये ४.८ मि.टन आणि २०११-१२ मध्ये ५.५ मिलीयन टन एवढे मांस उत्पादन झाले होते. म्हणजेच, एकूण मांस उत्पादनात भारतात मांस उत्पादनात दिवसेंदिवस वाढ होत गेल्याचे दिसून येते.

थोडक्यात, वरील आकडेवारी पाहता असे दिसून येते की, भारतातील शेळ्यांच्या मांस व दूधाच्या उत्पादनात वाढ होत आहे म्हणजचे त्याप्रमाणात मांस व दूधाला मागणी असून त्या मागणीत सतत वाढ होत आहे. यावरून असे स्पष्ट होते की, भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये शेळ्यांचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत आहे.

महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेत शेळी पालनाचे महत्त्व :

भारतीय अर्थव्यवस्थेप्रमाणेच, महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेमध्ये शेळी पालन या व्यवसायाला महत्त्व प्राप्त झाले असून, २००३-०४ मध्ये शेळ्यांपासून ३०१ मि.टन.दूध उत्पादन झाले होते तर २००४-०५ मध्ये २७९ मि.टन दूध उत्पादन झाले. २००५-०६ मध्ये २८२ मि.टन, २००६-०७ मध्ये २८१ मि.ट, २००७-०८ मध्ये २६५ मि.टन, २००८-०९ मध्ये २७७ मि.टन, २००९-१० मध्ये २८२ मि.टन, २०१०-११ मध्ये २७३ मि.टन, २०११-१२ मध्ये २९३ मि.टन, २०१२-२०१३ मध्ये ३०३ मि.टन आणि २०१३-१४ मध्ये २५० मि.टन एवढे शेळ्यांपासून दूध उत्पादन झाले होते. वरील आकडेवारीवरून असे दिसून येते की, दूध उत्पादनात पाहीजे त्या प्रमाणात वाढ झालेली नही पंरतू घट सुध्दा झालेली नाही म्हणजेच दूध उत्पादन हे सम प्रमाणात आहे.

शेळ्यांपासून महाराष्ट्र राज्यात मांस उत्पादन २००३-०४ मध्ये ५३ मि.टन, २००४-०५ मध्ये ५३ मि.टन, २००५-०६ मध्ये ५४ मि.टन, २००६-०७ मध्ये ५६ मि.टन, २००७-०८ मध्ये ५८ मि.टन, २००८-०९ मध्ये ५९ मि.टन, २००९-१० मध्ये ५९ मि.टन, २०१०-११ मध्ये ६२ मि.टन, २०११-१२ मध्ये ६३ मि.टन, २०१२-१३ मध्ये ७१ मि.टन आणि २०१३-१४ मध्ये ५७ मि.टन एवढे शेळ्यांपासून मांस उत्पादन झाल्याचे दिसून येते. म्हणजेच शेळ्यांपासून मिळणाऱ्या मांस उत्पादनात सतत वाढ होत असल्याचे दिसून येते म्हणजेच शेळ्यांपासून मिळणाऱ्या मांसाला सुध्दा मोठ्या प्रमाणात मागणी तयार होत आहे.

भारतातील शेळ्यांच्या जाती :

देशात शेळ्यांच्या प्रमुख २३ जाती असून, या सर्व शेळ्यांच्या जातीचा दूध व मांस उत्पादनासाठी उपयोग होतो. त्याप्रमाणेच शेळ्यांपासून शेतीसाठी उपयोगी असलेले मांसाचे खत, लेंडीखत, कातडी इत्यादी उत्पादन मोठ्या प्रमाणात मिळते. देशामध्ये मांस उत्पादनासाठी ब्लॅक बेंगाल, मलबारी, उस्मानबादी, आणि गंजम यांचा उपयोग होतो. तर दूध व मांस या दोन्हीही उत्पादनासाठी जमनापारी, बारबारी, सिरोही, बीटल, जाखराना, सुरती, संगमनेरी, मेहेसाना, आणि झालावाडी या जातींच्या शेळ्यांचा उपयोग होतो. तर चांगथांगी, गड्डी, चेगू या शेळ्यांपासून मोठ्या प्रमाणात लोकर मिळते.

भारतातील शेळ्यांच्या प्रमुख जातींची माहिती

अ. क्र	जात	मूळस्थान	उपयुक्तता	शारीरिक वजन		स्निग्धांश	विताचा काळ	जातीचे वैशिष्ट्ये
				नर	मादी			
१	पारी	उत्तर प्रदेश	दूध-मांस	६५-८६	४५-६०	५.२	२७४	रंग पांढरा भुरकट, रोमन नोज, मांडीवर भरपूर लांब केस, कान लांबट पिवळदार
२	सुरती	गुजरात, महाराष्ट्र	दूध-मांस	३५-४०	२५-३५	३.५	१५०	उत्तर महाराष्ट्र खान्देशात, गुजराथ मध्ये सुरतजवळ आढळते.
३	बारबेरी	उत्तर प्रदेश	दूध-मांस	३५-४०	२५-३५	३.९	१६७	रंग पाढंरा, भुरका, विटकरी, तांबुस रंगाचे ठिपके, जुळ्याचे प्रमाण अधिक, बंदिस्त पध्दतीने संगोपन करण्यास अनुकूल
४	बिटल	पंजाब	दूध-मांस	६५-८५	४५-६०	४.५	२८७	रंग काळा चमकदार, रोमन नोज, जमनापारी जातीपासून संकरीत जात
५	सिरोही	राजस्थान	दूध-मांस	५०	४०	३.५	१५०	रंग काळा, जुळे देण्याची क्षमता, दोन वर्षात तीन वेते देते, काटक नियमित वेते देते.
६	काळी	बंगाल,	मांस व	१४-१६	९-१४	४.१	१५०	मांस व कातडीसाठी प्रसिध्द बटकी जात, कातडी

	बंगाली	ओरिसा	कातडी उत्पादन					निर्यात होते.
७	ाबादी	महाराष्ट्र	दूध-मांस	५०-६०	३५-४५	३.५	१५०	जुळे देण्याची क्षमता, रंग काळा, दोन वर्षात तीन वेते देते, काटक नियमित वेते देते.
८	काश्मिरी (पश्मिना)	तिबेट सरहद, काश्मीर खोरे	(फर)	४०	३५	३.०	१००	अतिथंड प्रदेशात तिबेट सरहद्दीत आढळते, तलम धाग्यासाठी प्रसिध्द
९	मारवाडी	राजस्थान	दूध-मांस	३५	२५	३.५	१५०	रंग काळा व चमकदार, अंगावर लांब केस असतात.
१०	झाडलावाडी	गुजरात	दूध-मांस	५०	४०	३.५	१५०	अतिथंड प्रदेशात तिबेट सरहद्दीवर आढळते, तलम धाग्यासाठी प्रसिध्द

स्त्रोत : देशपांडे पी.एम. ''स्वयंरोजगारासाठी बंदिस्त शेळी पालन व्यवसासय'', आदित्य पब्लिकेशन, औरंगाबाद. पृ.३९-४०.

संदर्भ :

१. पशुसंवर्धन माहिती पुस्तिका, 'पशुगणना' महाराष्ट्र राज्य पुणे. पृ.६२.
२. देश अविनाश (२०१५), 'महाराष्ट्रातील शेळी-मेंढीपालन व्यवसाय सद्यस्थिती आणि आव्हाने', पशुधन एश्वर्य मासिक, पशुसंवर्धन आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.पृ.९८.
३. रसाळे उध्दव (२०१५),''बंदिस्त शेळी पालन काळाची गरज'', गोडवा कृषी प्रकाशन, पुणे. पृ.२०,२१.)
४. शंभरकर अर्चना (२०१३), ''दुसरी चहरितक्रांती'', लोकराज्य, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन, नोव्हेंबर, पृ.३६.
५. पशुगणना १६ वी १९९७, १७ वी २००३, १८ वी २००७ आणि १९ वी २०१२.
६. संदर्भ-प्राणी व मत्स्य विभाग, २००२-१२.
७. संदर्भ-इकॉनॉमिक सर्वे ऑफ महाराष्ट्र, २०१२-१३.

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with* International Impact Factor 4.374
UGC Approved Journal Sr. No.48455

ISSN No. 2394-8426
Apr– 2018
Issue–I, Volume–VII (I)

स्त्री-शिक्षणासाठी आधुनिक विचारप्रवाह -एक अध्ययन

प्रा. डॉ. वंदना रामदास चवरे
विभाग प्रमुख - इतिहास
लेट निर्धन पाटील वाघाये कला,वाणिज्य,व विज्ञान महाविद्यालय
सानगडी ता. साकोली जि. भंडारा

समरी:-

सरकारने स्त्री विषयक शिक्षण धोरण आखून शैक्षणिक क्षेत्रात मोठी क्रांती घडवून आणली आहे.ज्ञान, कौशल्य आणि रोजगार प्राप्त करण्यासाठी लोकांना सक्षम करुन मानव विकास साधण्यामध्ये शिक्षण महत्वाची भूमिका बजावित आहे. कोणतेही शैक्षणिक कार्यक्रम, विशेषत: राज्यशासन आणि स्थानिक स्वराज्य संस्थाच्या संयुक्त विद्यमाणे राबविले जात असतात. मुलभूत शिक्षणाची अधिकांश जबाबदारी जरी राज्यशासनाची असली तरी शैक्षणिक यंत्रणा,स्थानिक परिस्थितीशी अधिक प्रतिसादशील व्हावी व त्यामध्ये सामाजिक सहभाग मिळविणे सुलभ व्हावे, या हेतूने ग्रामीण व नागरी ह्या दोन्ही भागांमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांना देखील शालेय शिक्षणामध्ये सहभागी करुन घेतले आणि शैक्षणिक क्षेत्रात अधिक पारदर्शकता आणण्याचा प्रयत्न केला आहे. आधुनिक शिक्षणामुळे स्त्रिया जागतिकीकरणाच्या आर्थिक विकासाच्या क्षेत्रातही सहभागी होऊन आपल्या कार्याचा ठसा उमटवित आहे.

प्रस्तावना:-

भारत हा विकसनशील देश आहे. आपल्या विकसनशील देशाला विकसित अवस्थेपर्यंत पोहाचविण्यासाठी २०२० सालाचे एक नवीन स्वप्न आपले माजी राष्ट्रपती 'ए. पी. जे. अब्दुल कलाम' यांनी सर्व भारतीयांना दाखविले आहे. लोकसंख्या शास्त्राच्या अभ्यासकांनी संख्याशास्त्राच्या साहाय्याने असे दाखवून दिले आहे की, २०२० साली भारत हा जगातील सर्वात अधिक तरुण असणारा देश असेल. २०२० साली तरुण असणाऱ्या या लोकसंख्येला सक्षम करण्यासाठी सद्यस्थितीत शिक्षणाच्या भूमिकेचा विचार करणे अत्यंत गरजेचे आहे. शिक्षणाच्या माध्यमातून मानवी श्रमाचा दर्जा उंचावला जाणे आवश्यक असते. म्हणूनच शिक्षणावरील खर्च, कौशल्यनिर्मिती, संशोधन, आरोग्य सुविधांतील सुधारणा यांचा वापर मनुष्यबळ विकासासाठी करावा लागणार आहे. शिक्षण हे मनुष्यबळ विकासाचे एकमेव साधन आहे. म्हणून थोर शिक्षणतज्ञानी म्हटले आहे की, शिक्षण ही भविष्यकाळाची गंतवणूक व समाज परिवर्तनाचे साधन आहे.[१]

स्वातंत्र्योतर भारताने १९५१ पासून नियोजनाच्या माध्यमातून आर्थिक विकासाला चालना दिलेली आहे. भारताने १९९१ पासून स्विकारलेल्या खुल्या आर्थिक धोरणामुळे सेवा क्षेत्राच्या जोरावर देशाची विकासात्मक वाटचाल झपाटयाने होत आहे. भारतीयांनी वसाहतकाळा पासून असलेले इंग्रजीचे ज्ञान, माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील क्रांती आणि जागतिक व्यापार संघटनेच्या सेवा व्यापार विषयक करारास मंजुरी (GATS- General Agreement on Trade in Services) यामुळेही सेवा क्षेत्राचे स्वरुप व व्याप्तीत वाढ झालेली आहे. सध्या जगातीलपहिल्या १०बाजाराभिमुख अर्थव्यवथांपैकी एक म्हणून भारतीय अर्थव्यवस्थेचा उल्लेख केला जात आहे.[२]

भारत- सेवा क्षेत्र वृध्दी दर (%)

वर्ष	सेवा क्षेत्र वृध्दीदर%	अर्थ व्यवस्था वृध्दीदर%
२००१– ०१	७.७	४.४
२००१- ०२	७.१	५.८
२००२-०३	७.३	३.८
२००३-०४	८.२	८.५

२००४-०५	९.९	७.५
२००५-०६	१०.०	८.४
२००६-०७	११.२	९.२
२००७-०८	११.०	९.२
२००९-१०	१०	८.०५
संदर्भ : RBI Annual Report 2008-09. Economic Survey of India 2010-11		

तक्त्यातील आकडेवारीनुसार भारतीय अर्थव्यवस्थेची भरभराट सेवा क्षेत्राच्या जोरावर होत असल्याचे स्पष्ट होते. सन २००० नंतर भारताने 'GATS'करारावर शिक्कामोर्तब केले असून परिणामी त्यानंतर सेवाक्षेत्राची वृध्दी वेगाने होत असल्याचे दिसून येते. सेवाक्षेत्राला शेती व उद्योग क्षेत्राची अपेक्षित साथ न मिळाल्याने देशाचा वृध्दीदर दोन अंकी बनू शकलेला नाही, जी विकासाची अट आहे.

सेवाक्षेत्राचे अर्थव्यवस्थेत स्थान :-

अर्थव्यवस्थेचे उत्पादक उपक्रम

प्राथमिक क्षेत्र	**द्वितियक क्षेत्र**	**तृतीयक क्षेत्र/ सेवाक्षेत्र**
ती, जंगल, मस्य वसाय, नैसर्गिक साधन पतीवर आधारीत मानवी मग्रीचा कमाल वापर.	खनिज उत्पादने, कारखानदारी, बांधकाम, वीज, गॅस, पाणीपुरवठा उत्पादक उपक्रम.	सर्व प्रकारच्या उत्पादक सेवा व्यापार, वाहतूक, दळणवळण बँक वित्त व्यवहार,**शिक्षण**,आरोग्य, विमा सामाजिक व वैयतिक सेवा. इतर दोन्ही क्षेत्रांच्या वाढीला हात भार .

स्थूल देशांतर्गत उत्पादनाचे क्षेत्रीय विश्लेषण (%)

वर्ष	**शेती**	**उद्योग**	**सेवा**
१९५०-५१	५५	१४.५०	३०.५०
१९८०-८१	२७	४४.००	२९.००
१९९०-९१	२८.५२	३०.४७	४१.१०
१९९५-९६	२५.८९	३०.४७	४३.६४
२००१-०२	२२.२६	२७.६४	५०.१०
२००५-०६	१८.००	२८.३६	५३.६४
२००९-१०	१७.००	२८.००	५५.००
संदर्भ : Centre for monitoring Indian Economy National Accounts Statistics.			

सेवा क्षेत्राचे महत्त्वाचे कार्य :-

प्राथमिक व द्वितियक क्षेत्रांच्या विकासाला हातभार लावणे विस्तारीत असते.

म्हणजेच सेवाक्षेत्राचे महत्त्व अनन्य साधारण आहे. सेवाक्षेत्रात ज्या घटकांचा समावेश होतो त्या मध्ये शिक्षण हे अग्रभागी आहे.

राष्ट्रीय उत्पादन :-

१) यात प्राथमिक क्षेत्राचे योगदान खूप जास्त असेल असे देश अल्पविकसित.

२) द्वितियक क्षेत्राचे योगदान खूप जास्त असेल तर ते देश विकसित असल्याचे लक्षण.

३) तृतीयक क्षेत्र चांगलेच विस्तारित असेल व स्थूल देशांतर्गत उत्पादन व एकूण रोजगारात तृतीयक क्षेत्राचा वाटा फार मोठा असेल तर ते विकसीत देश असतात.[३]

भारताच्या स्थूल देशांतर्गत उत्पादनातील प्रत्येक क्षेत्राचा वाटा वर्ष	प्राथमिक	द्वितियक	तृतीयक
१९५०-५१	५७.७०%	१४.८०%	२७.५०%
२०००-०१	२८.४०%	२२.२०%	४९.४०%

वरील तक्त्या वरुन असे दिसून येते की सन १९५०-५१ ते सन २०००-०१ या कालावधीत भारताच्या स्थूल देशांतर्गत उत्पादनातील सेवाक्षेत्राचा वाटा वाढत गेला आहे. म्हणजेच देश अल्प विकास अवस्थेकडून विकसनशील अवस्थेकडे आलेला आहे.[४]

सेवाक्षेत्रात आधुनिक शिक्षणाचे स्थान :-

सेवा क्षेत्रात सर्व प्रकारच्या उत्पादक सेवांचा समावेश होतो. त्यामधील काही सेवांची नावे : व्यापार, वाहतूक दळणवळण, बँका आणि वित्त व्यवहार, शिक्षण, आरोग्य, विमा, सामाजिक आणि वैयक्तिक सेवा.

विविध प्रकारच्या सेवांचा विचार करता आणि सेवाक्षेत्रांचे महत्वाचे कार्य आणि हेतू बघता असे लक्षात येते की शिक्षण हा सेवाक्षेत्रातील अत्यंत महत्वाचा घटक आहे. उत्पादन प्रक्रियेचे जे चार घटक आहेत. भूमी, भांडवल श्रम, संयोजन या पैंकी भांडवल, श्रम आणि संयोजन यामध्ये सकारात्मक, विकासभिमुख बदल घडवण्याचे शिक्षण हे महत्वाचे साधन आहे. यासर्व वरील परिस्थिती मुळे स्त्री- शिक्षणावरही आधुनिक विचार प्रवाहाचा परिणाम झालेला आहे. ते आधुनिक विचार प्रवाह खालील प्रमाणे आहे.

१. स्त्रियांचा उच्च शिक्षणाकडे पाहण्याच्या दृष्टीकोनात बदल :-

सामान्यपणे स्त्रियांचा उच्च शिक्षणाचा पारंपारिक दृष्टिकोन पदवी मिळवणे हाच आहे. आज बदलत्या परिस्थितीनुसार त्यात बदल केला पाहिजे. आज पदवी शिक्षणाबरोबर उपयोजित स्वरुपाचे व्यावसायिक अभ्यासक्रम शिकविणे गरजेचे आहे. त्यामुळे स्त्रिया स्व:ताच्या पायावर उभ्या राहू शकतील. पदवी शिक्षणक्रमात आधुनिक तंत्रज्ञान व माहिती देणारे शिक्षण समाविष्ट करणे आवश्यक आहे. असे शिक्षण स्त्रियांना स्वावलंबी व स्वयंपूर्ण करू शकेल.

२. व्यावसायिक शिक्षणाची पायाभरणी :-

भारतीय समाज पुरुषप्रधान संस्कृती असणारा आहे. अर्थार्जनाची सूत्रे प्राचीन काळापासून पुरुष वर्गाच्या हाती आहेत. त्यामुळे स्त्रीला दुय्यम स्थान प्राप्त झाले. स्त्रियांना आजही अर्थार्जनासाठी पुरुषांवर अवलंबून राहावे लागत आहे. स्त्रिया जर व्यावसायिक शिक्षण घेऊन आर्थिक दृष्टया कार्यक्षम बनल्या तर निश्चितच स्त्री सबलीकरणाचे उद्दिष्ट साध्य होईल. यासाठी महिला व्यावसायिक, तांत्रिक शिक्षणात विशेष सोयी सवलती दिल्या गेल्या पाहिजेत. माध्यमिक शाळेत व्यवसाय मार्गदर्शन केंद्राची स्थापना, व्यवसाय व्यवस्थापनाचे विशेष प्रशिक्षण अभ्यासक्रम राबवणे आवश्यक आहे.[५]

३. स्त्री-सुरक्षिततेच्या नियमांची तरतूद व अंमलबजावणी :-

महिलांवर शाळेत, कॉलेजमध्ये, नोकरीवर जाताना व नोकरीच्या ठिकाणी अत्याचार होतात त्यामुळे असुरक्षततेची भावना निर्माण होते. त्यामुळे भारतीय समाज शिक्षणापेक्षा चारित्र्य टिकवणे, नैतिकतेसाठी धडपडतो आहे. शासनाने महिलांवर होणाऱ्या अत्याचारांची दखल घेवून त्यांच्या सुरक्षिततेसाठी कठोर नियमांची अंमलबजावणी केली पाहिजे.

या शिवाय असे कायदे विशेष हिंदू विवाह कायदा (१९५५), हिंदू वारसा कायदा (१९५६), घटस्फोट प्रतिबंधक कायदा (१९५५), हिंदू अडॉप्शन ॲण्ड मेंटेनंस ॲक्ट (१९५६) या कायद्यात सुधारणा व प्रत्यक्ष अंमलबजावणी व्हावी. महिलांच्या शिक्षणासाठी उद्योग क्षेत्र किंवा व्यक्तीकडून गुंतवणूक करण्याचा नियम केला पाहिजे.[६]

४. विवाहाची वयोमर्यादा वाढवणे :-

शासनाने जरी मुलीचे वय १८ वर्ष असणे कायद्याने बंधनकारक केले आहे. परंतु ग्रामीण भागात, अशिक्षित व आदिवासी भागात १८ वर्ष वय होण्याअगोदरच मुलींची लग्ने होतांना आजही दिसत आहेत. याची शासनाने दखल घेऊन त्याविरूध्द कडक अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. तसेच १८ वर्ष वयोमर्यादेतही फक्त १२ वी पर्यंत शिक्षण घेता येते. लग्नानंतर सांसारीक जबाबदाऱ्या, बाळंतपण यामुळे स्त्रियांच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष होते. बहुधा त्यांचे शिक्षण थांबवले जाते म्हणून शासनाने त्याविषयी लक्ष घालून वेळीच विवाहाची वयोमर्यादा १८ वर्षापेक्षा जास्त केल्यास त्यांना उच्च शिक्षण घेता येईल.

५. आरक्षणाची सोय :-

महिलांचा राजकारणातील सहभाग आणखी वाढावा व प्रतिनिधित्व मिळावे याकरीता ७३ आणि ७४ च्या घटना दुरुस्तीतून पंचायात व स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये महिलांना ३३ टक्के आरक्षणाची सोय असून या ३३ टक्के आरक्षणाची आजही अंमलबजावणी झालेली नाही.[७] म्हणून महिलांना प्रत्येक ठिकाणी आरक्षणाची सोय केल्यास त्यांच्या शिक्षणाचा आणि सबलीकरणाचा संख्यात्मक आणि गुणात्मक दर्जा टिकवणे शक्य होईल.

उदा. आदिवासी मुली किंवा मुस्लीम समाजाच्या किंवा इतर कोणत्याही मागासलेल्या समाजाचे शैक्षणिक मागासलेपण घालवण्यासाठी विशेष शिष्यवृत्ती किंवा आरक्षण द्यावे.

६. पालक व समाज यांच्यात स्त्री- शिक्षणविषयक जागरुकता निर्माण करणे:-

मुलगा वंशाचा दिवा अशी समजूत आजही समाजात आहे. त्यामुळे आपण स्त्रीभ्रूणहत्या प्रकरणे वर्तमानपत्रांत वाचत असतो. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीने २००८ मध्ये करण्यात आलेल्या सर्वेक्षणात महाराष्ट्रात मुलींचे दर हजारी प्रमाण कमी होत असल्यामुळे सार्वजनिक आरोग्य विभागाच्यावतीने विविध उपक्रम हाती घेण्यात आले. 'आंमची मुलगी' या संकेत स्थळाची निर्मिती करुन स्त्रीभ्रूण हत्तेविरुध्द गर्भलिंगनिदान चाचणीबाबत डॉक्टरांविरुध्द तक्रार करावयाची असल्यास या 'हेल्प लाइन' चा वापर करावा असे आव्हान करण्यात आले.[८] आपल्या पुरुष प्रधान समाजात मुलींच्या शिक्षणाचा उपयोग माहेरच्या कुटूंबांना होत नाही, पालकांचा म्हातारपणी सांभाळ करण्याची क्षमता / जबाबदारी फक्त मुलाचीच असते. या मानसिकतेला वैचारिक आणि भावनिक क्रांतीतून तडा देउन स्त्री-शिक्षणाचा म्हणजेच महिलांना सक्षम करण्याचा प्रयत्न यशस्वीपणे केला गेला पाहिजे.

७. उच्च शिक्षणात कार्यक्षम योजनांची अंमलबजावणी:-

स्त्रियांच्या प्राथमिक, माध्यमिक शिक्षणांत अनेक योजनांच्या आधारे सुधारणा झाल्या आहेत. परंतु उच्च शिक्षणात स्त्रियांचा सहभाग अत्यल्प दिसून येतो. यासाठी शासनाने स्त्रियांच्या उच्च शिक्षणात कार्यक्षम योजनांद्वारे स्त्रियांचा सहभाग वाढवला पाहिजे. तरच स्त्रिया आजच्या आधुनिक परिस्थितीला सामोर जाऊ शकेल. त्यासाठी शिष्यवृत्या, कमी खर्चात शिक्षण, मोफत शिक्षण, मोफत वसतिगृह, शिक्षणानंतर नौकरी मिळवून देण्याची शाश्वती यांसारख्या योजनांद्वारे महिला उच्च शिक्षित होतील.

८. स्त्री- शिक्षणात कार्यक्षम योजनांची अमलबजावणी :-

स्त्रियांच्या शिक्षणात जागतिकीकरण, खाजगीकरण, उदारीकरण यांना सामोर जाण्याची क्षमता, कौशल्य देणारे शिक्षण असणे गरजेचे आहे. त्यासाठी शिक्षणाचे आधुनिकीकरण करुन संगणक, माहिती-तंत्रज्ञान संप्रेषन क्षेत्र, व्यवस्थापन यांचे शिक्षण देणे गरजेचे आहे. या आधुनिक शिक्षणामुळे मुलींना नोकरीच्या निरनिराळ्या संधी उपलब्ध होतील.[९]

९. स्त्री-शिक्षणासंदर्भात संशोधन :-

शैक्षणिक संशोधन हे स्त्री-शिक्षणात संख्यात्मक व गुणात्मक स्वरुपात होणे गरजेचे आहे. शिक्षणाचे ध्येय व त्यांची साध्यता अभ्यासक्रम, अध्यापन पध्दती, व्यवस्थापन, मूल्यमापन या संदर्भात संशोधन हाती घेऊन त्यांच्या निष्कर्षांचा उपयोग स्त्रियांच्या विकासासाठी केला जावा.

वरील सर्व बदल प्रत्यक्षात झाल्यास स्त्रियांचे समाजात स्थान, स्वरुप बदलून जाईल. त्यासाठी शासनाला शालेय धोरणात बदल करणे गरजेचे आहे. त्यातून स्त्रियांच्या विकासातील शालेय शिक्षणाचा पाया पक्का होईल.[१०]

१०. स्त्रियांच्या व्यक्तिमत्वविकास कार्यक्रमांवर भर :-

स्त्रियांच्या व्यक्तिमत्व विकासाच्या दृष्टीने प्राथमिक, माध्यमिक स्तरापासूनच औपचारिक शिक्षणाबरोबर अनौपचारिक शिक्षण मिळणे गरजेचे आहे. स्त्रियांची शिक्षणाबद्दल उदासीनता हे त्यांच्या अपयशाचे गमक आहे. स्त्री संघटनांची संख्या वाढली पाहिजे. स्त्रियांसाठी व्याख्याने, चर्चासत्रे, यांचे आयोजन झाले पाहिजे. यांमुळे स्त्रिया स्वयंपूर्ण होऊन शिक्षणातील व जीवनातील समस्यांना त्या समर्थपणे तोंड देऊ शकतील.

सामाजिक जबाबदाऱ्या :-

१) प्रत्येक महिला प्रतिनिधींची सामाजिक जबाबदारी आहे की समाजातील अनिष्ट रुढी, परंपरा, चालीरीती यांमध्ये बदल घडवून आणावा.

२) हुंडयाला कायद्याने बंदी असलीतरी प्रत्यक्ष हुंडा घेतल्याशिवाय आपल्याकडे विवाह होत नाहीत. तेव्हा स्त्रियांनी स्वत: पुढाकार घेऊन हुंडाबंदी करावी.

३) अंधश्रध्देचे प्रमाण ग्रामीण भागांतून जास्त प्रमाणात असते व त्यातच अंधश्रध्देला बळी पडणाऱ्यांमध्ये स्त्रियांचे प्रमाण जास्त असते. याचे मुख्य कारण म्हणजे,आपल्याकडे धर्म व समाज या दोन्हीही ठिकाणी स्त्रियांना गौण स्थान आहे. अंधश्रध्दा घालवण्यासाठी शिक्षक व सामाजिक नेत्यांद्वारे जाणीवजागृती होणे आवश्यक आहे.[११]

निष्कर्ष

भारतात जागतिकीकरण, आधुनिकीकरणला १९९१ पासून सुरुवात झाली. स्त्रिया कोणत्याही क्षेत्रात मागे पडू नये याकरिता स्त्रियांना तांत्रिक, व्यावसायिक, संगणक क्षेत्रात जास्तीत जास्त संधी उपलब्ध करुण देण्यासाठी सरकारने तशा प्रकारचे शिक्षण महिलांना देऊन त्यात सहभाग करून घ्यावे.

केंद्रशासन व राज्यशासन यानी महिलांची निरक्षरता कमी करण्यासाठी आयोग व समित्यांची नियुक्ती केली, मोफत पाठयपुस्तके, गणवेश, मोफत शिक्षण या सारख्या भरीव योजना समोर आणल्या. या सर्व सोयीसुविधा देऊनही स्त्रियांचे निरक्षरतेचे प्रमाण मात्र अजूनही चिंताजनक आहे.१९९४ च्या महिला धोरणात महिला शिक्षणास सर्व बाजुंनी गती देण्याचा प्रयत्न केलेला दिसून येते. या धोरणात शिक्षण व तांत्रिक शिक्षणासाठी ज्यातरतूदी सुचविल्या आहेत त्यामध्ये धोरणात्मक सकारात्मकता आहे. परंतु त्या मध्ये काटेकोर व संपुर्ण नियोजनाचा अभाव जाणवते.

१) खैरनार के.एस. : सेवा क्षेत्रात शिक्षणाची भूमिका : योजना - विकास समर्पित मासिक, सप्टेंबर २०११ पृ. क्र. १०

२) खरात जी. डी. : भारतातील सेवाक्षेत्राची यशस्वी वाटचाल : योजना - विकास समर्पित मासिक, सप्टेंबर २०११, पृ. क्र. १५

३) खैरनार के. एस. : उपरोक्त, योजना सप्टेंबर २०११ पृ. क्र. ११

४) खैरनार के. एस. : कित्ता, सप्टेंबर २०११ पृ. क्र. ११

५) सपकाळ दत्तात्रय मनोहर **:** महिला सक्षमीकरणासाठी शिक्षण : शिक्षण संक्रमण,महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे. मार्च २०१२, पृ. क्र. ३७

६) बॅ. पुगलिया सुनीता : स्त्री आणि कायदा : मु. श. किर्लोस्कर, पुणे. प्र. आ. १९७५ पृ. क्र. १०२

७)पवार दीपक : महिलांचे सक्षमीकरण : श्री साईनाथ प्रकाशन १, भगवाघर कॉम्पलेक्स, धरमपेठ, नागपूर, पृ. क्र. १०

८) कुलकर्णी चारुशीला :'आंमची मुलगी संकेत स्थळात बिघाड': १३ जुन, लोकसत्ता, २०१२

९)सपकाळ दत्तात्रय मनोहर **:** उपरोक्त, मार्च २०१२, पृ. क्र. ३७,

१०)कित्ता,पृ. क्र. ३८

११) अंकुश सुनीता : ग्रामीण महिला शिक्षणापासून किती विकसित ? किती वंचित ? शिक्षण संक्रमण, महाराष्ट्रराज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे. मार्च २०१२,पृ. क्र. २४